
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




आजचा रंग निळा !



वर्ष : ०५ | अंक : ४०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२४ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नांदूरपठार, पिंपळगांवरोठा बस सुरू करा रवींद्र राजदेव यांचा आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** वर्षानुवर्षे सुरू असलेली पारनेर-नांदूरपठार व नांदूरपठार-नगर बस ही नियमितपणे येत नसून नगर ते पिंपळगांवरोठा ही बस अचानक बंद करण्यात आल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराने या बसेस नियमित सुरू कराव्यात या मागणीचे निवेदन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांनी आगारप्रमुखांना सादर केले असून बसेस सुरू न झाल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

बहुजन सुखाय, बहुजन हिताय तसेच गाव तिथे एसटी हे ब्रिद घेउन खेडयापाडयांमध्ये सेवा देणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाची पारनेर-नांदूरपठार ही बस नियमित सुरू होती. पारनेर-नांदूरपठार-अहिल्यानगर असा या बसचा मार्ग आहे. या बसचा उपयोग विद्यार्थी, प्रवासी तसेच नगरला औषधोपचारासाठी जाणा-या रूग्णांना होतो. दुसरीकडे नगरहून दुपारी अडीच वाजता पिंपळगांव रोठा या बसने नागरिकांना पुन्हा नांदूरपठार, पिंपळगांवरोठा येथे येता येत असे. कान्हूरपठार येथील अनेक पासधारक विद्यार्थीही या बसचा वापर करत होते. जनतेच्या सेवेसाठी असलेल्या या बससेवा अचानक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने प्रवाशांची मोठी कुचंबना होत आहे.

पारनेर-नांदूरपठार ही बस सुरेगांव मुक्कामी बसशी लिंक आहे. आता प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे ही बस फक्त मंगळवार, बुधवार, गुरूवार व शुक्रवार या चारच दिवशी नांदूरपठारकडे येते. इतर दिवशी ही बस कुठे जाते ? तर नगर-पिंपळगांवरोठा ही बस बंद करून कुठे वळविली याचीही माहीती पारनेर आगार प्रशासनास असावी असा उपरोधीक टोलाही या निवेदनात लगावण्यात आला आहे.

या मार्गावरील दोन्ही बसेस दररोज सुरळीत सुरू न झाल्यास पारनेर आगारात प्रसार माध्यमांना सोबत घेऊन आमच्या स्टाईलने आंदोलन करून जाब विचारला जाईल. बसेस सुरू होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. पारनेर आगार प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी असा इशारा निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी प्रशासनाला दिला आहे.

## 'सत्ता, संपत्ती वाहून गेली, जीव वाचवा'... करमाळ्यात आक्रोश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, सोलापूर :** महापूर हा किती क्रूर असतो हे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील नागरीक अनुभवत आहेत. मुंबई, पुण्यात तितका पाऊस नाही. पण बीड, धाराशिव आणि सोलापुरात पावसाने हाहा:कार माजवला आहे. या क्रूर पावसाने हजारो नागरिकांच्या डोळ्यांमध्ये पाणी आणलं आहे. शेती, घरं-दारं, संसार उद्ध्वस्त झाली आहेतच, पण या पावसाने नागरिकांना जीव वाचवण्यासाठी धरपड करायला लावली आहे. माणसं जीव वाचवण्यासाठी मदतीची अक्षरश: याचना करताना दिसत आहेत. इतकं वाईट संकट हे कधीच कुणावर येऊ नये. महापुरात गावांमध्ये अडकलेल्या नागरिकांची अवस्था आपल्या डोळ्यांनी आपण पाहू शकत नाहीत अशी आहे. करमाळ्याचा असाच एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओतील एक गावकरी हा सरकार आणि प्रशासनाला गावकऱ्यांचा जीव वाचवण्यासाठी रेस्क्यू करावं, अशी कळकळीची विनंती करताना दिसत आहे.



**गावकरी व्हिडीओत काय म्हणतोय?**

सोलापूरच्या करमााळा तालुक्यातील संगोबा सीनाकाठी नदीकाठी आम्ही सर्व ग्रामस्थ, महसूल प्रशासनातील १२ तलाठी, २ सर्कल आणि पोलीस पाटील, कोतवाल आहेत. आम्ही रात्रीपासून या पूर परिस्थितीत अडकलो आहोत. महाराष्ट्र सरकारच्या सगळ्या यंत्रणेला आम्हाला सांगायचं आहे. कृपया आमची सूटका करा. आमचं बचावकार्य करावं. एनडीआरएफ किंवा हेलिकॉप्टरच्या माध्यमातून बचावकार्य करावं. आमची सुटका करण्यासाठी प्रयत्न करावं, अशी विनंती संबंधित व्यक्ती करत आहे.

महसूल प्रशासनाने आम्हाला मदत केली आहे. आमचे आमदार नारायण आबांना आम्ही संपर्क केला आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्याशी संपर्क केला आहे. सोलापूर जिल्ह्याचे नैसर्गिक आपत्तीचे प्रमुख ढोणे यांच्याशी बोललो आहोत. तहसीलदार शिल्पा मॅडम यांनी आतापर्यंत सर्व मदतकार्याला सुरुवात केली आहे. आमची शासनाला आणि सर्व यंत्रणाला हात जोडून विनंती आहे. लहान मुलं, वयोवृद्ध महिला आहेत, स्वत: महसूल प्रशासनाची माणसं आहोत. ६० ते ८० जण आहोत. या सर्वांना वाचवण्यासाठी एनडीआरएफ इथे येणं गरजेचं आहे. नाहीतर आमच्या या सर्व लोकांच्या जीवितास हानी उद्भवू शकतो, अशी भीती गावकऱ्याने व्यक्त केली.

सीनाकाठी नदीचं रौद्ररुप निर्माण झालेलं आहे. प्रशासनाने हेलिकॉप्टरच्या मदतीने आम्हाला मदतकार्य करावं, अशी नम्र विनंती करतो. सीनाकाठच्या सगळ्या गावांमध्ये पाणी आहे. पूल पाण्यात गेली आहेत. गावांचा संपर्क तुटला आहे. त्यामुळे जीव महत्त्वाचा आहे. सत्ता, संपत्ती वाहून गेली आहे. आम्हाला केवळ आमच्या जीवची पर्वा आहे. आम्हाला वाचवण्यासाटी प्रशासनाने सहकार्य करावं, अशी विनंती व्हिडीओतील व्यक्ती करताना दिसत आहे.

## कॉँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याला साडी नेसवणं भाजप पदाधिकाऱ्यांना भोवणार?



**दि.२३, डोंबिवली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉर्फ व्हिडियो समाज माध्यमांवर व्हायरल करणे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश उर्फ मामा पगारे या. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी गाफील ठेवून मामांना साडी नेसवून निषेध व्यक्त केला. तर ७२ वर्षीय काँगेसच्या या ज्येष्ठ नेत्याला साडी नेसवणे भाजपा कार्यकत्यांनाही महागात पडणार असल्याची चिन्ह आहेत. मंगळवारी सकाळी घडलेल्या या घटनेनंतर राजकीय वातावरण तापले आहे, तर दुसरीकडे या घटनेची कायदा, शांतता आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी दक्षता घेऊन चौकशी सुरू केली आहे.

डोंबिवलीत भाजपाचे पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी सकाळी नरेंद्र मोदींचा अवमान करणाऱ्या समाज माध्यमांवरील पोस्टचा थेट समाचार घेतला. संतप्त झालेल्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मामा पगारे यांना बोलावून घेतले. त्यानंतर त्यांना भर रस्त्यात साडी नेसवली. या घटनेनंतर काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. या घटनेवरुन काँग्रेस आणि भाजपमध्ये वाद पेटण्याची शक्यता आहे. ही घटना डोंबिवलीमध्ये घडली आहे. या घटनेनंतर राजकीय वातावरण तापले आहे. शिवाय ज्या काँग्रेस नेत्याला साडी नेसवण्यात आली, ते वयोवृद्ध आहेत. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची दाट शक्यता आहे.

## किसन वाडी रस्ता पाण्याखाली; नागरिक-शेतकरी त्रस्त..





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर (नाशिक) :** विंचूर परिसरात रात्रभर मुसळधार पाऊस झाल्याने, किसनवाडी रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेला असून, शेतकरी वर्ग व शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल सुरू झाले आहेत. रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या बंधाऱ्याची उंची रस्त्याच्या बरोबरीने घेतल्यामुळे बंधाऱ्यातील पाणी थेट रस्त्यावर आले असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शाळकरी विद्यार्थी, शेतकरी व महिला यांना या रस्त्यावरून ये-जा करताना जीव मुठीत धरावा लागत आहे. सध्या रस्त्यावरील पाणी इतके वाढले आहे की, वाहतुकीलाही धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, उद्या एखादा विद्यार्थी किंवा नागरिकाचा पाय घसरून बंधाऱ्यात पडून अनर्थ झाला, तर त्याला जबाबदार कोण धरायचे? शासनाला की बंधाऱ्याची उंची चुकीने वाढवणाऱ्या अभियंत्याला? असा सवाल निर्माण झाला आहे.

तसेच नागरिकांची ठाम मागणी आहे की, या बंधाऱ्याच्या कडेला रस्त्यालगत संरक्षणात्मक (कठडा) भिंत उभारली जावी, जेणेकरून अपघात टाळले जातील.

या संदर्भात बंडू सालकाडे, साईराम दरेकर, योगेश जेऊघाले, शिवाजी सालकाडे, नंदकिशोर पवार, मधु सालकाडे, भास्कर शिंदे आदी नागरिकांनी संताप व्यक्त करून प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान होत असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ये-जा करताना धोका पत्करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

## खनिज उत्खननातील ओव्हरबर्डनचा वापर रस्ते व विकासकामासाठी व्हावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** खनिज उत्खननादरम्यान निर्माण होणाऱ्या उपसा मातीचा (ओव्हरबर्डन) प्रभावी वापर करण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करून ओव्हरबर्डन डंपिंगचे अंतर ५ किलोमीटरवरून १० किलोमीटरपर्यंत वाढविण्यात यावे, अशी मागणी आ. किशोर जोरगेवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई मंत्रालयात भेट घेत केली आहे. राज्यात कोळसा, लोह, बॉक्साईट, मॅगनीज, चुनखडक आदी खनिजांचे उत्खनन प्रामुख्याने ओपन कास्ट पद्धतीने होत असून त्यादरम्यान मोठ्या प्रमाणावर ओव्हरबर्डन बाहेर पडते. सध्याच्या धोरणानुसार, हे ओव्हरबर्डन केवळ ५ किमी परिघात डंप करण्याची मुभा आहे. त्यामुळे खाणी परिसरात प्रचंड प्रमाणात मातीचे ढिगारे साचतात, त्यामुळे रस्ते, नाले व स्थानिक मार्गांवर माती पसरते, नद्यांचे पात्र उथळ होतात आणि पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढत असल्याचे आमदार जोरगेवार यांनी निवेदनात नमूद केले आहे. ओव्हरबर्डनचा वापर शहर व गावातील खड्डेमय रस्ते बुजविणे, शेत पाणंद रस्ते व इतर विकासकामांसाठी करता येणे शक्य आहे. या ओव्हरबर्डनचा वापर करून जलसाठे, सखल भूभाग यांचे भरण करून पूरनियंत्रणास मदत होईल. यामुळे संसाधनांचा पुनर्वापर करत पर्यावरण संरक्षण करता येईल असेही त्यांनी म्हटले आहे. खनिज उत्खनन करणाऱ्या कंपन्यांनी ओव्हरबर्डन वाहतुकीची जबाबदारी स्वीकारून आवश्यक त्या ठिकाणी पोहोचवावे, अशी तरतूद धोरणात स्पष्टपणे नमूद करण्याचीही मागणी आ. जोरगेवार यांनी यावेळी ना. चंद्रशेखर बावणकुळे यांना केली आहे.



**आ. किशोर जोरगेवार यांची मागणी**

## बेकायदेशीर बनावट दारु वाहतुक करणा-याना पोलीसांनी ठोकल्या बेड्या



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२३, वडगाव निंबाळकर :** निरा बारामती मार्गावर निंबुत गावच्या हद्दीत बेकायदेशीर दारु वाहतुक करणारे वाहन वडगाव निंबाळकर पोलीसांनी पकडले. यामध्ये दोघांवर बेकायदेशीर दारु वाहतुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मिळालेले वाहन व दारु असा ११ लाख ११ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शुभम रामचंद्र होळकर रा.रावडी ता फलटण, जि सातारा, सोमनाथ बाळासो पवार रा.करंजेपुल ता.बारामती, जि.पुणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. सोमवार २२ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता कारवाई करण्यात आली. एका वाहनातून बेकायदेशीर अवैद्यरित्या दारु आणली जात असल्याची माहीती पोलीसांना मिळाली .ही माहीी मिळताच निरा बारामती मार्गावर पोलीसांनी वाहनांची तपासणी सुरु केली. पुरंदर तालुक्यातून बारामती तालुक्यात प्रवेश करणार्या पहील्याच वळणावर पिकअप क्रमांक MH 11 DD 6926 अडवून तपासणी केली असता वाहनातून विनापरवाना बेकायदेशीर देशी व विदेशी दारुचे बॉक्स मिळून आले. पोलीसांनी गाडीत असलेल्या सोमनाथ व शुभम यानां परवाना व कागदपत्रां बाबत विचारणा केली. त्यांनी समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पोलिसांनी पिकअप गाडी व दारुसह मुद्देमाल ताब्यात घेतला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकुण किंमत ११ लाख ११ हजार ३७५ रुपये इतकी असल्याचे पंचनाम्यात नमुद केले आहे.

महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण संदीपसिंह गिल्ल, पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण, गणेश बिरादार अप्पर पोलीस अधिक्षक बारामती विभाग, सुदर्शन राठोड बारामती उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक नागनाथ पाटील, पोलीस हवालदार कुंडलिक कडवळे, पोलीस नाईक भाऊसाहेब मारकड, आबा जाधव, सुरज धोत्रे, विलास ओमासे व गृहरक्षक दलाचे सदस्य यांनी मिळून केली.

## संपादकीय



### राहुल गांधींचे मिशन गुजरात

बिहारमधील 'मतदार अधिकार यात्रा' झाल्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अलीकडेच थेट गुजरात गाठले. निमित्त होते काँग्रेसचे प्रेरणाधाम कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर. 'काँग्रेस २०२७च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला हरवणार', हा पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत लोकसभेत व्यक्त केलेला निर्धार आपण विसरणार नसल्याचे राहुल यांनी स्पष्ट केले.

गेल्या सहा महिन्यांत ते किमान पाचव्यांदा गुजरातला पोहोचले. विशेष मतपडताळणी (एसआयआर) व मतचोरी या विषयांची आपली 'लाइन' संसदेपासून बिहार व पुढे गुजरातपर्यंत वाढवताना, तेथील शिबिरातही 'वोट चोर, गद्दी छोड' अशी घोषणा देण्यास राहुल गांधी विसरले नाहीत. पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करण्यासाठी काँग्रेसच्या भात्यातील आणखी एक बाण, असे वर्णन केल्या जाणाऱ्या या मुद्द्यावर निवडणूक आयोगानंतर आता माध्यमेदेखील राहुल गांधी यांचे लक्ष्य असल्याचे दिसते.

गुजरात काँग्रेसच्या शहर आणि जिल्हाध्यक्षांसाठी १० ते १९ सप्टेंबर दरम्यानच्या १० दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराच्या निमित्ताने पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे व राहुल गांधी यांनीही राज्य काँग्रेसमध्ये असलेला नेतृत्वाचा अभाव स्वीकारला आहे. अर्थात हे दोन 'गुजरातचे लोक' देशाला कम कुवत करत आहेत, हे खर्गे यांचे व्यक्तिगत मत असावे! भाजपच्या या बालेकिल्ल्यात भाजप नेते तुमच्याबाबत काहीही सांगत असले तरी तुम्ही शांत रहावे; उर्वरित मार्ग सहज सापडेल, हा राहुल यांचा तर्क नव्या चर्चेला जन्म देणारा ठरावा. आत्ताच्या भाजपला देशभरातून हद्दपार करायचे असेल, तर त्याचा आरंभबिंदू गुजरात हाच असणार, हा राहुल गांधी यांचा विश्वास बिलकूल अनाठायी नाही.

१९९५मध्ये भाजपने पहिल्यांदाच गुजरातमध्ये सत्ता काबीज केली. त्यानंतरच्या सलग सात विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला; पण इतका दीर्घ काळ सत्तेबाहेर राहिल्यानंतरही काँग्रेसची पाळेमुळे गुजरातच्या मातीत घट्ट राहिली. कारण मुळात हा प्रांत 'महागुजरात'च! राहुल गांधींच्या ताज्या गुजरात दौऱ्यांमुळे काँग्रेसच्या केडरमध्ये नवी आशा, नवा उत्साह निर्माण झाला असणार. तरीही काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आणखी सक्रिय धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक आहे. दिल्लीत इंदिरा भवनात स्वस्थ बसून 'राहुल गांधी यांनीच सारे काही करावे', अशा वृत्तीतून, ट्विट-ट्विट खेळणाऱ्यांवर भिस्त टाकून हे मिशन गुजरात फत्ते करता येणार नाही, याची जाणीव गांधी मायलेकांना असणारच! आजच्या काळात कर्मण्येवाधिकारस्ते या भावनेने कोणीही काम करत नाही आणि राजकारणात तर नाहीच नाही.

सापुतारा हे पर्यटनस्थळ ज्या राज्यात वसते तो गुजरात भाजपकडून परत मिळवायचा असेल तर तेथे ऋराजकीय पर्यटनाऋचा काही उपयोग नाही, हेही त्यांच्या लक्षात आलेच असणार. राहुल गांधी यांनी सहा महिन्यांपूर्वी, मार्चमध्ये संघटना निर्मिती मोहीम सुरू करून, आपण गुजरातकडे अतिशय गांभीर्याने बघत आहोत, हे दाखवून दिले होते. त्यांच्या मते गुजरातमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वात दोन प्रकारचे लोक आहेत; एक म्हणजे जे जनतेसोबत उभे राहतात, त्यांच्या हृदयात काँग्रेसची विचारसरणी आहेत ते. आणि दुसरे, जे जनतेपासून तुटलेले आहेत. त्यातलेही अर्धे प्रदेश काँग्रेस नेते (आतून) भाजपला मिळालेले आहेत; परंतु अशांपैकी कारवाई कोणाकोणावर झाली, हे गुलदस्त्यात आहे. आणि 'तसे' नेते शोधायला राहुल यांना दिल्लीतून गुजरातेत कशाला जायला हवे!

# बेरोजगारीचे भीषण वास्तव !



भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरवशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

## पाऊस



पाऊस लागलाय दादागिरी करायला,
जा म्हटलं तरी धावतच यायला।

मेपासून सुरू केलंय मोफतलं शॉवर,
उन्हाळ्यात पण बिघडवलं आइसक्रीम-पॉवर।

सांगतोय कितीदा, जरा सुट्टी घे रे भाऊ,
तोच म्हणे, मी आलो की मिळतं धुवून मोफत नहाऊ

रस्त्यांवर बसवलाय त्याने स्वतःचा जलतरण तलाव,
गाड्या झाल्यात बोट, आणि लोक झाले नाव।

घरात कपडे वाळत नाहीत, चहा पण पातळ,
पावसाची ही दादागिरी खरीच भारी झालय खट्याळ

याच्या दादागिरीचा आता तर झालाय कहर,
रोगराईमुळे हॉस्पीटलांना आलाय बहर।

अजून एक गंभीर सांगतो याचे हाल खास,
हातातोंडाशी आलेला मातीमोल झाला पिकाचा घास।

अशीच चालू आहे ही दादागिरी, पावसाची चाल,
कधी होतोय त्रास तर कधी देतोय हिरवाईची माळ।

- पत्रकार -
विकास हरिभाऊ दळवी

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## नंदुरबारमध्ये आदिवासी समाज रस्त्यावर उतरला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, नंदुरबार :** राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यात आल्याने याच गॅझेटनुसार बंजारा समाजाचाही अनुसूचित जमातीत सम ावेश करावा या मागणीसाठी बंजारा समाज रस्त्यावर उतरला. त्यामुळे आदिवासी समाजात अस्वस्थता पसरल्याचे चित्र आहे. बंजारा समाजाच्या मागणीविरोधात आता आदिवासी समाजही एकवटला आहे. आदिवासी सम ाजाने आक्रमक पवित्रा घेत आज नंदुरबारच्या शहादा शहरात आदिवासी आरक्षण बचाव मोर्चा काढला. या मोर्चा आदिवासी संघटना सर्व राजकीय पक्ष आणि नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हजारो आदिवासी बांधवांनी रस्त्यावर उतरत अनुसुचित जमातीच्या आरक्षणाव गदा येऊ नये म्हणून एल्गार पुकारला. विशेषतः बंजारा समाजाच्या मागणीला कडाडून विरोध केला जात आहे. याचसाठी नंदुरबार जिल्ह्यातील शहादामध्ये हा आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात हजारोंच्या संख्येने आदिवासी समाज, आदिवासी संघटना आणि नेतेही सहभागी झाले.

# पावसा, एवढा निष्ठूर नको रे होऊ!



अरे पावसा, दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी तू धो धो कोसळत आहेस. पावसा, पेरणीच्या दिवसांत तू तेव्हा थोडाफार कोसळलास आणि यावर्षी बरकत येणार असे वाटत होते. मध्यंतरी तू खूप उघड दिली होतीस आणि शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लावला होतास आणि आता दररोज अनपेक्षित कोठून कसा, ध्यानीम नी नसताना मुसळधार स्वरूपात धो धो बरसत आहेस. नद्या नाले दुथडी भरून ओसंडून वाहत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतातून जिकडे तिकडे पाणीच पाणी वाहू लागले आहे. उभ्या पिकांच्या वावरात पाणी साचून दलदल निर्माण झाली आहे. पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्या हिरव्यागार पिकांकडे पाहून शेतकऱ्यांचे मन भरून येतं होते, समाधानाचे स्वप्न फुलत होते. पण तुझ्या ढगफुटीने सगळ्या स्वप्नांचा आता चुराडा झालाय.पिकांची राखरांगोळी होताना पाहून शेतकऱ्यांचे काळीज तटातटा तुटत आहे!

होय पावसा यावर्षी तू नकोसा झाला आहेस.इतरवेळी आम्ही सर्व जण सगळे तुझी आतुरतेने वाट पाहत असायचो. कधी येशील? वेळेवर पडशील की नाही?याची धास्ती लागायची. कधी कधी तुझी वाट पाहून आम्ही थकून जायचो. पण तू अशी हुलकावणी द्यायचा की आम्ही व आमचे शेतकरी हवालदिल होते असू. शेतातील उभे पिक जेव्हा तुझ्या वेळेवर न येण्यामुळे जागेवर करपून जायचे तेव्हा आमच्या हृदयात कालवाकालव होत असे! शेतकऱ्यांच्या सगळ्या स्वप्नांचा क्षणात चुराडा व्हायचा? महागडे बी बियाणे बेभरवशाच्या पावसावर विश्वास ठेवून जमिनीच्या उदरात पेरताना काळजावर भला मोठा दगड ठेवावा लागतो. पावसा तुझ्या बेभरवशामुळे शेती करणे म्हणजे मटका खेळण्यासारखे झाले आहे. लागला तर लागला नाहीतर हुकला ! परंतु, यावर्षी पावसा तू गरजेपेक्षा अधिक आणि सरासरी पेक्षा जास्त कोसळत आहेस. ढगफुटी होऊन सर्वत्र पाण्याचा भला मोठा लोंढा वाहून उभ्या पिकांना भुईसपाट करत आहेस. पुरात वाहून जाणारे पिक पाहून शेतकऱ्यांची होणारी दयनीय अवस्था आता पाहवत नाही.

आधीच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. कमी भावाने शेतकऱ्यांचा शेतीमाल विकत घेण्यासाठी व्यापारी टपून बसलेले असतात.सुगीचे दिवस आले की सगळ्या शेतीमालाचे दर कोसळतात. यावर कोणीच काही बोलत नाही.

मायबाप सरकार गप्प बसते. व्यापारी मस्तवाल बनतात आणि शेतकऱ्यांचा शेतीमाल कमी दराने घेऊन नंतर भाव वाढवून तोच शेतीमाल विकतात नि गडगंज नफा मिळवतात. लोकही किती निष्ठूर असतात. शेतकरी स्वतः बाजारात शेतीमाल व भाजीपाला विकायला बसले की ते विकत न घेता मॉल मध्ये जाऊन तेथील महागडे धान्य व भाजीपाला खरेदी करतात. म्हणजे सर्वांनी मिळून शेतकऱ्यांचा घाटा करण्याचा खेळ चालवला आहे.शेतकऱ्यांचा शेतीमाल म्हणजे फुकटात उत्पादित होत असतो अशी लोकांची धारणा झाली आहे.त्यावर आता तू पावसा निर्दयी बनला आहेस. पिके काढणीला आले असताना तू अति वृष्टीच्या रुपाने धुम ाकूळ घातला आहेस. म्हणजे सगळ्या शेतातील सर्व पिकांची नासधूस झाल्याशिवाय स्वस्थ न बसण्याचे तू ठरवले आहेस अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. निसर्गाच्या पुढे शेतकऱ्यांचे काही चालत नाही. तू सध्या ज्या त्वेषाने कोसळत आहेस ते थोडं थांबव आणि शेतात हताश होऊन थांबणाऱ्या शेतकऱ्यांची घालमेल बघ.

तुला तुझा निष्ठूरपणा लक्षात येईल. इतरांचा मुळीच अजिबात विचार करू नकोस. परंतु, साऱ्या जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पावसा तू निष्ठूर होऊ नकोस. शेतकऱ्यांना तुझी नेहमीच साथ सोबत पाहिजे. तू शेतकऱ्यांचा मित्र बन, शत्रू होऊ नकोस.

- बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर
जि.लातूर. मो.९५४५४४२६४८

## चंद्रघण्टा..

चंद्र घण्टा महाशक्ती
प्रिय तिला नील वर्ण
निलांबरा समान करे
स्नेह ममता विस्तीर्ण

श्रीसुक्तपठण करीत
फुले अर्पावी गोकर्ण
सप्तशती सार मनन
स्तवनगायन संकीर्ण

देवी मा लोभसवाणी
रुपेरीकांती तेजस्वर्ण
अष्टभुजा शस्त्रसज्ज
भक्तास रक्षीते संपूर्ण

मनातून श्रध्दा ठेवता
इच्छा होती परिपूर्ण
नीलकंठ पति सतीचा
राक्षसा करितो जीर्ण

भक्तीचा रे नीलसागर
भरता काठोकाठ पूर्ण
फुटेल पालवी हिरवी
असूनि वल्ली निष्पर्ण

जातुकासूराच्यामर्दना
महामाया गं अवतीर्ण
अवतार स्त्री त्रीशक्ती
संकटे पसरे अवकीर्ण

नवयुगांत नारी तशीचं
सकल क्षेत्रात उत्तीर्ण
स्पर्श जसा परिसपूर्ण
आयुष्य बनवी सुवर्ण

- हेमंत मुसरीक, पुणे
मो.९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### पत्रकारांवरील हल्ल्याचा व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने निषेध तहसीलदाराना दिले निवेदन...



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, पालम (परभणी)** : दि.२० सप्टेंबर रोजी त्र्यंबकेश्वर, वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तास चे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टिव्ही चे ब्यूरो चीफ अभिजित सोनवणे व पुढारी न्युज चे ब्यूरो चीफ किरण ताजने यांच्यावर गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी शिवागीळ करीत हल्ला केला.

पत्रकारांवर वारंवार होणारे असे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी, चौथ्या स्तंभावर घाला घालणारी गंभीर बाब आहे.

या हल्ल्याच्या निषेधार्थ पालम तालुका व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात मारहान करणाऱ्या हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्यात यावी.,पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासनामार्फत विशेष उपाययोजना करण्यात याव्यात,भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने ठोस व प्रभावी धोरण आखावे. अशा मागण्या करत निषेध नोंदवला.

यावेळी गुणवंत सराफ, चांद तांबोळी, शिवाजी शिंदे, धोंडीराम कळंबे, भगवान करंजे, गोविंद सोलेवाड, शेख गौस, लक्ष्मण दुधाटे, रूकमाजी गिणगीने, बालासाहेब फुलपगार, अनिस खूरेशी, अंकुश वाघमारे, विनोद कांबळे, प्रल्हाद पांचाळ, मोतीराम शिंदे, केरबा बहिरवाड,अवधूत जाधव, इत्यादी पत्रकार उपस्थित होते.

### त्र्यंबेकश्वर येथे पत्रकारांवर हल्याच्या निषेधार्थ भारतीय पत्रकार संघाच्या वतीने निवेदन



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२३, वडगाव निंबाळकर** : त्र्यंबकेश्वर येथे पार्किंग माफियांनी पत्रकारांवर भ्याड हल्ला करुन गंभीर स्वरुपात जख्मी केले. याच्या निषेधार्थ भारतीय पत्रकार संघ बारामती तालुक्याच्या वतीने आज निषेध नोंदवून वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन ला निवेदन देण्यात आले.

नाशिक येथिल सिंहस्थ कुंभमेळा बैठकीच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वर येथे वृत्तांकनासाठी गेलेल्या किरण ताजणे, योगेश खरे, अभिजीत सोनवणे यांच्यावर पार्किंग माफीयां कडून भ्याड हल्ला करण्यात आला. यामधे ताजणे हे गंभीर जखमी झाले होते. एकीकडे महाराष्ट्र शासन पत्रकार सुरक्षा कायद्या बाबत कारवाई चे परिपत्रक काढत असले तरी दुसरीकडे पत्रकारांवर होणारे हल्ले काही कमी होतं नाहीत.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असणारे पत्रकार आज ही सुरक्षित नसल्याचे समोर आले आहे. अनेक पत्रकार संघानीं या घटनेचा निषेध केला आहे. भारतीय पत्रकार संघ बारामती तालुका यांनी या घटनेचा निषेध करुन गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल व्हावा यासाठी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे साह्यक पोलीस निरिक्षक नागनाथ पाटील यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

या वेळी भारतीय पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर बनसोडे, उपाध्यक्ष महमद शेख, हल्ला कृती समिती प्रमुख अजय पिसाळ, फिरोज भालदार, विनोद गोलांडे, जितेंद्र काकडे उपस्थित होते.

### बनावट कागपत्राच्या आधारे परप्रांतीय कामगारांचा मतदार यादीत नोंदी!

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२३, पारनेर :** सुपा औद्योगिक वसाहतीतील परप्रांतीय कामगारांची काही राजकीय लोकांकडून स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी सुपा गावच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या परप्रांतीय लोकांची कसल्याही प्रकारचे व्हेरिफिकेशन न करता फक्त आधार कार्डचा समोरील बाजुचा फोटो घेऊन ऑनलाईन पद्धतीने अफरातफर करून बी.एल.ओ.सोबत आर्थिक व्यवहार करुन सुपा ग्रामपंचायत मतदार यादी मध्ये ड्युब्लिकेट कागदपत्रांच्या आधारे हेराफेरी करून मोठ्या संख्येने नोंद झाली असल्याची धक्कादायक माहिती सुपा येथील जागृत नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निदर्शनास आणून दिली हा गंभीर प्रकार असल्यामुळे याची ग्रामपंचायत मध्ये चौकशी केली असता परप्रांतीय लोकांना कोणत्याही प्रकारचे रहिवासी दाखला दिला नसल्याचे सरपंच व ग्रामसेवक यांनी सांगितले तसेच सुपा ग्रामपंचायत मध्ये परप्रांतीय लोकांची मतदार यादी मध्ये नोंद न करण्याबाबत ठराव झाला असल्याचे सरपंच व ग्रामसेवक यांनी सांगितले त्यामुळे बी.एल.ओ.ने.कशाच्या आधारे नोंद केली

> ड्युब्लिकेट आधार कार्ड बनवून देणारे कॅप्युटर चालक, नोंद करणाऱ्या, बी.एल.ओ. अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करत कारवाई करुन पारनेर तहसिलदारांनी परप्रांतीयांच्या नोंदी रद्द करुन सुपा गावच्या सुरक्षिततेला निर्माण झालेला धोका व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कायदेशीर कारवाई करावी.
>
> **- मनसे नेते अविनाश पवार**

याबाबत पारनेर तहसीलदार यांना निवेदन देऊन निवडणूक शाखेकडून याबाबत लिखीत स्वरुपात खुलासा करण्याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सूचित करत मागणी केली आहे की, या परप्रांतीय लोकांना ड्युब्लिकेट कागदपत्रे काढण्यासाठी मदत करणारे संबंधितअधिकारी, बी.एल.ओ., कॅप्युटर चालक, आधार केंद्र चालक ज्यांनी परप्रांतीय लोकांना ड्युब्लिकेट कागदपत्रांच्या आधारे नोंद करण्यासाठी मदत केली त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी तहसीलदार यांना केली असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी सांगितले जर या गंभीर गोष्टीचा गांभीर्याने विचार करुन त्वरित आठ दिवसांत कारवाई झाली नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तहसील कार्यालयात सुपा गावच्या सुरक्षिततेला धोका निर्माण केल्यामुळे मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येणार असल्याचे पवार यांनी प्रसिद्धीं पत्रकाद्वारे सांगितले.

# मांडओहळ येथील 'विश्रामगृहा'ची दुरावस्था

## शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधींचे ही दुर्लक्ष; दुरुस्तीसाठी पाठपुराव्याची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील कर्जुलेहार्या हे ठिकाण पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेजवळ असून नगर कल्याण महामार्गावर आहे. जवळच मांडओहळ येथील अहिल्यानगर जलसंपदा विभागाचे पाटबंधारे खात्याच्या मांडओहळ मध्यम प्रकल्प शासकीय विशामधामची दुरवस्था झाली आहे.

गेल्या ४३ वर्षांपासून मांडओहळच्या वैभवात भर टाकणारे हे विशामगृह शासनाची उदासीनता आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अखेरची घटका मोजत असून विशामगृहाला उकीरड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

मांडओहळ धरणाच्या निर्मितीवेळी अधिकार्यांना धरणाची पाहणी व तपासणी करण्यासाठी पर्यटक, अभ्यासक यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून ४३ वर्षांपूर्वी विश्रामधामची उभारणी करण्यात आली. मांडओहळ धरणाचे बांधकाम सुरू झाले. त्यावेळी राजकीय नेतेमंडळी, शासकीय अधिकार्यांच्या सेवेसाठी सर्व सोयी-सुविधांनीयुक्त विश्रामगृह कर्जुलेहार्या येथिल मांडओहळ परिसरात बांधण्यात आले.

देखभाल-दुरुस्तीसाठी शासकीय कर्मचार्यांची नियुक्ती करण्यात आली. परिसरातील बागेसाठी माळी ही कार्यरत ठेवण्यात आले. जेवण बनविण्यासाठी खानसाम्याची नियुक्तीही झाली. विश्रामधामने उत्तम सोयी-सुविधा पुरवल्या. येथील बागबगीचा सौंदर्यात भर टाकत होता.

या विश्रामगृहात एक व्हीआयपी खोली असून एक मिटींग रुम आहे. तर दोन खोल्या रहाण्यासाठी असून एक खोली स्वयंपाकाची आहे. तर विश्राम गृहाच्या समोर पटांगणात आहे.




मात्र गेल्या ८ - १० वर्षांत याचे वैभव संपुष्टात आले असून या विश्रामगृहाला उकीरड्याचे स्वरूप आले असून शासनाने दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले आहे. निर्मनुष्य विश्रामगृह असल्याने येथे बेकायदेशीर प्रकार होत असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये आहे. सुरुवातीच्या काळात विश्रामधामसाठी नेमण्यात आलेले खानसामा रामदास झावरे हे होते. त्यानंतर खानसामा रंगनाथ रांधवण व भाऊसाहेब जगदाळे ही जोडी प्रसिद्ध होती. रुचकर जेवणाची चव घेण्यासाठी जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांच्या बैठका मांडओहळ विश्रामगृहात होत होत्या. आमदार व मंत्री यांचे दौरे नेहमी होत होते. सध्या खानसामा सेवानिवृत्त झाले. तसेच माळी, चौकीदार यांच्यासह इतर कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे हे विश्रामधाम सध्या कर्मचार्यांविना ओस पडले आहे. अधिकारी तर केवळ काही कार्यक्रम असेल तरच विश्रामगृहाकडे फिरकतात.

विश्रामगृहामध्ये विद्युत वायरिंग खराब झाल्याने विश्रामगृह पूर्णपणे अंधारात असून विश्रामगृहातील चांगल्या प्रकारे आलेली विविध झाडे पाण्याअभावी वाळू गेली आहेत. सर्वत्र गवत झाल्याने विश्राम गृहाला उकीरड्याचे स्वरूप आले आहे. चक्क विश्राम गृहात जनावरे फिरताना दिसत आहेत. झाडांची बाग नामशेष झाली आहे. विश्रामगृहाच्या लोखंडी गेट तुटलेले आहे.

अहिल्यानगर जलसंपदा विभाग पाटबंधारे विभागाच्या कार्यालयांतर्गत हे विश्रामगृह येते. गेल्या १० ते १५ वर्षांपासून विश्रामगृहाच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले गेले नाही. पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकारी आणि तालुक्यातील लोकप्रतिनिधी मांडओहळ येथील विश्रामगृहाला आलेले उकंड्याचे स्वरूप कधी घालविणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# केंद्र शासनाच्या निरीक्षकांकडून 'आदि कर्मयोगी' अभियानाचा आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** केंद्र शासनाच्या जनजातीय कार्य मंत्रालयाच्या संचालक व महाराष्ट्र राज्याच्या निरीक्षक दीपाली मासिरकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आदि कर्मयोगी अभियान अंतर्गत जिल्ह्यातील कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवर व जिल्हा मास्टर ट्रेनर्स, ब्लॉक मास्टर ट्रेनर्स उपस्थित होते.

सदर बैठकीत जिल्ह्यातील आदि कर्मयोगी अभियान अंतर्गत सुरू असलेल्या कार्यक्रमांचे सादरीकरण प्रकल्प अधिकारी विकास राचेलवर यांनी केले. या बैठकीत विविध विभागांचे समन्वयक, आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी सुरू असलेल्या योजनांची अंमलबजावणी, तसेच प्रलंबित कामे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

दीपाली मासिरकर यांनी प्रत्येक जिल्हा व ब्लॉक लेव्हल्स मास्टर ट्रेनर्सच्या कामकाजाचा आढावा घेतला. तळागाळातील लोकांपर्यंत अभियानाचा लाभ पोहोचविण्यासाठी प्रभावी पावले उचलण्याच्या सूचना देऊन त्या म्हणाल्या, ग्राम कृती आराखडा ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी पूर्ण करून ०२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विशेष ग्रामसभेमध्ये तो मंजूर करून घ्यावा. तसेच आदिसेवा केंद्र सक्रीय करून या अभियानाबाबतच्या पायाभूत सुविधा, उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर भर द्यावा. सर्व ग्रामसेवकांनी व्हिलेज ॲक्शन प्लॅन तयार करत असताना गावातील सर्व नागरिकांना त्यामध्ये समाविष्ट करायचे आहे.



आदिसेवा केंद्र स्थापन झाल्यानंतर नागरिकांच्या ज्या काही समस्या आहे, त्या आदि सेवा केंद्रांतर्गत सोडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. पुढे त्या म्हणाल्या, व्हिलेज ॲक्शन प्लॅन तयार करत असताना गावातील आवश्यक असलेल्या बाबी सुटून जाणार नाही, याकडे आदि कर्मयोगी यांनी लक्ष द्यावे. सर्व आराखडे हे गावामध्ये शिवार फेरी करून करायचे आहे आणि त्याला २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेमध्ये मंजुरी द्यायची आहे. सदर आराखडे हे जिल्हास्तरीय समितीकडे येतील आणि नंतर ते राज्यस्तरीय समितीकडे जातील. अभियानांतर्गत निश्चित केलेले सर्व उपक्रम दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना दीपाली मासिरकर यांनी दिल्या. बैठकीत परस्पर सहकार्य वाढवून आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे ठरले.

या भेटी दरम्यान दीपाली मासिरकर यांच्या हस्ते व मुख्य कार्यपालन अधिकारी पुलकीत सिंह, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्या उपस्थितीत लोहारा (ता.चंद्रपूर) व जानाळा (ता.मूल) येथे आदिसेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

# स्वदेशीचा नारा... पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मास्टर स्ट्रोक..

....पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घटस्थापनेच्या मुहूर्तावर भारतीय लोकांना स्वदेशीचा नारा दिला. जीएसटी २.०ची घोषणा करताना हा स्वदेशीचा नारा दिला. याला फार मोठा अर्थ आहे. स्वदेशीचा नारा हा नुसता नारा नाही तर भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून उभे करण्याच्या मोदींच्या योजनेची ही सुरुवात आहे. स्वदेशी चळवळ सुरू झाली ती बंगाल फाळणीचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीवरून, तिचा उद्देश ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देणे हा होता.

पण आज त्याचे महत्त्व यानिमित्ताने पटत आहे. कारण अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतासह ब्राझील आणि कैक देशांवर टॅरिफ लावण्याचा आत्मघातकी निर्णय घेतला आहे. पण राष्ट्रवादाची भावना वाढवण्यासाठी त्यावेळी म्हणजे स्वातंत्र्य मिळवण्याआधी स्वदेशी चळवळीचा उपयोग झाला असला तरीही नंतर मात्र आर्थिक उदारीकरणामुळे भारताचे वाढते महत्त्व आणि भारताचे महत्त्व कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. त्याला शह म्हणून मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला. स्वदेशी चळवळीच्या महत्त्वातच आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याचे मोदी यांचे आणखी एक उद्दिष्ट साध्य करण्याची आकांक्षा दडली आहे आणि त्यामुळे अशा उपक्रमांना प्रेरणा मिळते. खरे तर स्वदेशीचे महत्त्व तेव्हाही होते. गांधी यांनी स्वदेशी चळवळ सुरू केली आणि तेव्हा स्वदेशीचे महत्त्व लोकांना पटू लागले. पण नंतरच्या काँग्रेस नेत्यांनी या स्वदेशी चळवळीला तिलांजली दिली आणि जरी खादी ग्रामोद्योगसारखे उपक्रम सुरू केले असले तरीही काँग्रेसचे नेते आलिशान पोषाखात आणि परदेशी वस्तूंचा वापर करत राहिले. त्यांचा प्रभाव आपण पाहात राहिलो आणि त्यांनाच मते देत राहिलो. पण मोदी यांनी आता काँग्रेसला चांगलेच उत्तर दिले आहे आणि काँग्रेस देशातून भुईसपाट झाली. पण काँग्रेसचे जे चांगले विचार होते ते मोदी यांनी स्वीकारले. स्वदेशी चळवळ ही ब्रिटिश धोरणांना विरोध म्हणून सुरू झाली, तर आताची स्वदेशी चळवळ ही ट्रम्प यांच्या धोरणांना उत्तर म्हणून सुरू करण्यात येत आहे. पण मोदी यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्वदेशी चळवळ इतक्यावरच थांबले नाहीत, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या मूलमंत्राला त्यांनी स्थान दिले आणि 'वन नेशन वन टॅक्स' हा मूलमंत्र लागू केला. त्यामुळे आता जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कराचे दोन टप्पे लागू असतील. त्यानुसार केवळ पाच टक्के आणि १८ टक्के असे दोनच कर स्लॅब असतील. यामुळे कर प्रणालीत सुसूत्रता येईल आणि लोकांनाही नवीन कर प्रणाली सहज समजेल. वन नेशन वन टॅक्स यामुळे देश डझनभर करांच्या जाळ्यातून मुक्त झाला. मोदी सरकारचे ब्रीद 'नागरिक देवो भवः' असे आहे आणि त्यातूनच मोदी सरकार नवनव्या सुधारणा पुढे आणत आहे, असे म्हणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीएसटी करातील सुधारणा या देशाच्या अर्थसंकल्पाला नवे गतिमान देणाऱ्या ठरतील यात काही शंका नाही. अंदाजे अडीच लाख कोटी रुपयांची वार्षिक बचत या बदलांमुळे थेट ग्राहकांच्या खिशात पडणार असून हा पैसा पुन्हा बाजारपेठेत वळेल असा अंदाज आहे. मागणीला त्यामुळे प्रोत्साहन मिळेल आणि अर्थव्यवस्थेचे गाडे चालू राहील अशी दूसरी सकारात्मक बाजू आहे. आता जीएसटीतील बदलांमुळे रोजच्या वापरातील औषधे, घरगुती वापराच्या वस्तू, विमा सेवा यावरील जीएसटी कमी होईल आणि लोकांची क्रयशक्ती वाढेल. महागाईवर अंकुश बसेल. असे चांगले सकारात्मक परिणाम मोदी यांच्या जीएसटी २.० योजनेमुळे भारतीय ग्राहकांना चांगले दिवस येतील. मध्यमवर्गीय कुटुंबाचा बजेटवर ताण पडतो तो महागाईमुळे. तो कमी झाल्यामुळे आपोआपच ग्राहकांची क्रयशक्ती वाढेल आणि ते अन्यत्र खर्च करू शकतील. म्हणजे दुसरा साधा अर्थ काय तर मागणी वाढल्यामुळे अर्थचक्राचे गाडे सुरू राहील. मोदी यांची स्वदेशीचा नारा हा अशा वेळेला आला आहे, की ज्यावेळी ट्रम्प यांच्यासारख्या भारतविरोधी नेत्यांनी भारतावर अवाच्या सव्वा टॅरिफ लागू केला आहे. त्याला मोदी यांनी दिलेले हे उत्तर आहे. कारण जनतेच्या हातात पैसा आला, की बाजारात तेजी येते आणि अर्थव्यवस्थेला गती येते. तेच आताही दिसणार आहे. यामुळे लहान-मोठ्या व्यवसायांना गती येईल आणि बाजारात चैतन्य येईल. यालाच गुणक परिणाम म्हणतात. सर्व स्तरांतून या निर्णयाचे स्वागत होत आहे यावरून हा निर्णय देशासाठी चांगला आहे हे मान्य करावे लागेल. कारण जीएसटी आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के राहील. याचा परिणाम व्यापारी वर्गावर जास्त होणार आहे, कारण त्यांच्यावर या निर्णयाचा सर्वात चांगला परिणाम होणार आहे.

अर्थात हे सर्व असले तरीही राजकारणापासून जीएसटी सुधारणाही सुटल्या नाहीत. काँग्रेसला भाजपचे काहीच चांगले दिसत नाही, त्यामुळे त्यांनी यावर टीका करणे क्रमप्राप्तच होते. पण ममता बॅनर्जी आणि बिहारमधील विरोधी नेते यावर टीका करत आहेत. कारण हा चांगला निर्णय मोदी यांचा आहे. ही श्रेयवादाची लढाई आहे. ममता यांनी आपल्या सरकारला याचे श्रेय जाते असे म्हटले आहे. पण त्यांनी असे म्हणणे हे श्रेयवादाच्या लढाईत त्यांचा पराभव दिसत असल्यामुळे आहे हे खरेच आहे. जीएसटी ही संकल्पना प्रथम स्वर्गीय अरुण जेटली यांनी मांडली आणि तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीच होते. त्यामुळे यांचे श्रेय घेण्याचे प्रयत्न निव्वळ श्रेय लाटण्याचे आहे. पण आता जीएसटी सर्वमान्य झाली आहे आणि आता तर जीएसटी २.० ही आली आहे. मोदी यांचा हा निर्णय देशाच्या भल्यासाठी आहे आणि जनतेच्या अंतिम कल्याणासाठी आहे. कारण कोणताही निर्णय शेवटी जनतेच्या कल्याणासाठीच करायचा असतो. मोदी हे सर्व चांगले जाणतात आणि त्यामुळे त्यांनी हा निर्णय अमलात आणला आहे. फ्रान्सने सुरू केलेला ही संकल्पना आज सर्व जगाची ओळख बनली आहे आणि स्वदेशीच्या नाऱ्याची याला जोड देऊन मोदी यांनी मास्टर स्ट्रोक मारला, हे मान्य करायलाच हवे. कारण आर्थिक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे, मोदी यानी ते ओळखले आहे.

**- श्री.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर.**

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२३, सोलापूर :** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पाऊस अतिवृष्टी तसेच भीमा व सीना नदीला आलेल्या महापुरामुळे माढा करमाळा मोहोळ पंढरपूर उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर या अनेक गावांमधील नागरिक पुराच्या पाण्यात अडकलेले आहेत त्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी जिल्हा प्रशासन तालुकास्तरीय यंत्रणाच्या सहकार्यातून प्रयत्नशील आहे. तरी जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख तसेच तालुकास्तरीय यंत्रणा प्रमुखांनी मुख्यालय सोडू नये व या आपत्तीच्या परिस्थितीत दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.




जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थिती चा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा कृषी अधिक्षक शुक्राचार्य भोसले, महावितरणचे अधिक्षक अभियंता एस.एम.माने, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, अति. आयुक्त सो.म.पा. संदीप कारंजे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, कार्यकारी अभियंता सा.बां.जि.प. नरेंद्र खराडे यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात पूरग्रस्तांसाठी उभारण्यात आलेल्या निवारा केंद्रांमध्ये सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, ग्रामपंचायत, महसूल व महावितरण विभागातील प्रत्येकी दोन कर्मचारी १२-१२ तासांच्या शिफ्टमध्ये कार्यरत राहतील, असे त्यांनी आदेशित केले. तसेच कोणीही मुख्यालय सोडणार नाही याबाबत दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी ठेकेदारांशी समन्वय साधून आपत्कालीन परिस्थितीत सहकार्य करावे, आरोग्य विभागाने औषधांचा पुरवठा करून डॉक्टर, सिस्टर, आशा वर्कर व सफाई कर्मचारी नेमावेत, ग्रामपंचायत विभागाने स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

महावितरण विभागाने २४ तास लाईनमन नियुक्त करावा, इरिगेशन विभागाने संभाव्य पूरग्रस्त गावांची यादी सादर करावी, तर ग्रामीण पोलीस विभागाने दक्ष राहून इतर विभागांशी समन्वय साधावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या. या कामात हलगर्जीपणा केल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे शेतकऱ्यांच्या बांधावर

## पावसामुळे शेती पिकांचे नुकसान; तातडीने पंचनामे करण्याचे आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याची गंभीर दखल घेत तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्यासह प्रशासनाने खडकवाडी, पळशी परिसरात नुकसानीची पाहणी सुरू केली आहे. तालुक्यातील सर्व तलाठी आणि कृषी अधिकाऱ्यांना नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यानुसार कामाला गती मिळाली आहे.



अतिवृष्टीमुळे शेती, पिके, घरे आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने नागरिकांना नुकसानीची तात्काळ माहिती महसूल किंवा कृषी अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन केले आहे. यामुळे शासनाकडे अहवाल पाठवणे सुलभ होईल आणि पीडितांना लवकरात लवकर मदत मिळू शकेल. नागरिकांनी संयम राखून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

यावेळी पळशी गावचे सरपंच प्रकाश राठोड, गणेश हाके, बन्सी गागरे, संपत जाधव, विकास हिंगडे, आदी पळशी व खडकवाडी परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

तहसीलदार गायत्री सौंदणे यांनी या संकटकाळात नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले. ते म्हणाले, प्रशासकीय अधिकारी म्हणून मी आणि संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा तुमच्या सोबत आहे. आम्ही नुकसानग्रस्तांना शक्य ती सर्व मदत करू. प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून, पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून मदत व नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया गतिमान होईल, अशी अपेक्षा आहे. नागरिकांनी नुकसानीची माहिती त्वरित नोंदवावी आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पारनेरच्या सर्व भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी सदृश पाऊस झाल्यामुळे शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तहसीलदारांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली असून सौंदाणे यांनी महसूल प्रशासकीय यंत्रणेला व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

# मुंब्रा स्टेशनचं नाव मुंब्रादेवी होणार...?




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, मुंब्रा (ठाणे) :** पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय मार्गावरील रेल्वे स्थानकांची नावे काही महिन्यांपूर्वी बदलण्यात आली. ही नाव बदलण्यात आल्यानंतर आता मध्य रेल्वेच्या मार्गावरील महत्त्वाचं स्थानक असलेल्या मुंब्रा स्थानकाचं नाव बदलण्याची मागणी जोर धरु लागली आहे. यासाठी पुन्हा एकदा अनोख्या पद्धतीने रेल्वे स्थानकामध्ये अज्ञात व्यक्तीने स्ट्रीकर लावल्याचा प्रकार समोर आला आहे.गेल्या अनेक वर्षांपासून मध्य रेल्वेच्या मुंब्रा रेल्वे स्थानकाला 'मुंब्रा देवी' असे नाव देण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. ही मागणी करण्यामागचं कारण म्हणजे मुंब्रा रेल्वे स्थानकाला लागूनच मुंब्रा देवीचे मंदिर आहे. त्यामुळेच या स्थानकाला मुंब्रादेवी असे नाव देण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून जोर धरत आहे.

दरम्यान अनेकदा अर्ज आणि विनंत्या करुन कोणताही निर्णय न आल्याने सोमवारी रात्री एका अज्ञात व्यक्तीने मुंब्रा रेल्वे स्थानकावरील मुंब्रा रेल्वे फलकावर 'मुंब्रा देवी' असे स्ट्रीकर चिटकवले. ही बाब उघड झाल्यानंतर तातडीने हे स्ट्रीकर्स हटवण्यात आले असून या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच स्टेशनवरील सीसीटीव्हीमधील फुटेजच्या माध्यमातून हे स्ट्रीकर्स कोणी चिटकवले याचा शोध पोलीस घेत आहेत. तसे पाहिल्यास मुंब्र्यात ऐतिहासिक पार्श्वभूमी पहिल्यास त्याबद्दल तीन टप्प्यात सांगता येईल.

प्रारंभिक काळ आणि नावाची उत्पत्ती: मुंब्रा हे नाव आगरी-कोळी समुदायाच्या कुलदेवता मुंब्रा देवीवरून पडले आहे. १७ व्या शतकात मुंब्रा हे एक छोटे मासेमारी गाव होते, जिथे आगरी आणि कोली समुदाय मुख्यत्वे राहत होते. खाडीच्या किनारी असलेल्या या गावाला सामरिक महत्त्व होते. ज्यामुळे येथे जहाज बांधणी उद्योगाची सुरुवात झाली. मुघल आणि मराठा काळ: मुघल काळात (१६ वे-१७ वे शतक) मुंब्रा कल्याण किल्ल्याच्या संरक्षणासाठी चौकी म्हणून विकसित झाले. खाडीमुळे येथे सुरक्षित बंदर होते, ज्याने जहाज बांधणीला चालना मिळाली. मराठ्यांच्या काळातही येथील जहाज बांधणी उद्योगाने महत्त्व कायम ठेवले. साधारणता १८ व्या-१९ व्या शतकात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात मुंब्रा व्यापारी दृष्ट्या महत्वाचे ठरले.

मुंबईच्या जवळ असल्याने येथे व्यापार आणि मासेमारी वाढली. याच काळात मुंब्रा देवी मंदिराचा विकास झाला, जे आजही आगरी-कोळी समुदायाचे श्रद्धास्थान आहे. मुंब्रा देवी मंदिर डोंगराच्या माथ्यावर आहे, जिथे पोहोचण्यासाठी सुमारे ७५० पायऱ्या चढाव्या लागतात. हे मंदिर स्थानिक भगत कुटुंबाने बांधले, जे आजही मुंब्र्यात राहतात. नवरात्रीच्या काळात येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. विशेष म्हणजे नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी हे नाव बदलण्याची मागणी पुन्हा चर्चेत आली आहे.

# परिवहन सेवेतील पुढील पाऊल पॉड टॅक्सी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** वाढत्या शहरीकरणामुळे शहरांचा विस्तार होत आहे. नागरिकांना कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी बराच प्रवास करावा लागतो. सार्वजनिक परिवहन व्यवस्थेच्या बळकटीकरणासह नागरिकांना 'लास्ट माइल कनेक्टिविटी' देणे सध्या गरजेचे आहे. परिवहन सेवेचे पुढचे पाऊल 'पॉड टॅक्सी' असून ही सेवा' लास्ट माइल कनेक्टिव्हिटी' साठी नागरिकांच्या सेवेत आणावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे पॉड टॅक्सीबाबत आयोजित बैठकीत दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुर्ला ते वांद्रे रेल्वे स्थानकादरम्यान असलेल्या 'बिझनेस डिस्ट्रिक्ट' मध्ये ही सेवा महत्त्वाची ठरणार आहे. या ठिकाणी भविष्यात होणारे बुलेट ट्रेन स्टेशन, मुंबई उच्च न्यायालय यामुळे या भागातील नागरिकांची वर्दळ वाढणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या परिवहन सेवेवर यामुळे ताण येऊन नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागण्याची दाट शक्यता आहे. भविष्यात या भागात नागरिकांना विनाविलंब आणि सहजरित्या परिवहन सेवा मिळण्यासाठी पॉड टॅक्सी पर्याय ठरेल.

मुंबईमध्ये सर्व परिवहन सेवांमध्ये सिंगल कार्डच्या माध्यमातून प्रवास करता येण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. याच सिंगल कार्डद्वारे पॉड टॅक्सीची सेवाही नागरिकांना घेता आली पाहिजे, या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

पॉड टॅक्सीच्या अनुषंगाने कुर्ला आणि वांद्रे स्थानक परिसराचा विकास करण्यात यावा. कुर्ला स्थानक परिसरात असलेल्या पोलिस निवासाच्या जागेऐवजी पोलिसांना त्याच भागात जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स भागातील इमारती या पॉड टॅक्सीने स्टेशनला जोडण्यात याव्यात, असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

# थोडक्यात

## परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान; तहसीलदारांना मदतीसाठी निवेदन सादर



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२३, केज (बीड) :** गेल्या अनेक दिवसापासून बीड जिल्ह्यासहित केज तालुक्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे होळ व बनसारोळा येथील शेतकऱ्यांच्या पिकाचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून शासनाने तात्काळ दखल घेऊन ओला दुष्काळ जाहीर करावा. तसेच शेतकऱ्याला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत करण्यात यावी व संपूर्ण पिक विमा लागू करण्यात यावा यासाठी तहसीलदारांकडे युवा नेते मा. संग्राम (भैय्या) शिंदे, ॲड. राजेश शिंदे, सुनील (बापू)देशमुख यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी निवेदन दिले. तसेच मागण्या मान्य न झाल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला. यावेळी तहसीलदार यांनी लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत करण्याचे आश्वासन देखील दिले.

## शासनाच्या विविध परवानग्यांअभावी मुनावळे जलपर्यटन प्रकल्प रखडला



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२३, सातारा :** कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयावर मुनावळे (ता.जावली) या ठिकाणी १०.११ हेक्टर क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचा जल पर्यटन प्रकल्प विकसित करण्याचे काम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सुरू केले होते. मात्र हा परिसर अतिसंवेदनशील व्याघ्र अधिवास क्षेत्राचा भाग असल्याने सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती. यानंतर विविध विभागांच्या ना-हरकत परवानग्या मिळाल्याशिवाय प्रकल्पातील कामे सुरू करू नका, असा लेखी आदेश कोयना सिंचन विभागाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला दिला होता. त्यानंतर तब्बल ५ महिन्यांनी पर्यटन विकास महामंडळाला अवघ्या दोन परवानग्या मिळवण्यात यश आले आहे. त्यामुळे उर्वरित परवानग्यांअभावी प्रकल्प रखडण्याची भीती निर्माण झाली आहे. दरम्यान शासनाने प्रकल्पाच्या कामाची काढलेली निविदा रद्द करून सर्व परवानग्या मिळाल्यानंतर फेरनिविदा काढावी, अशी मागणी मोरे यांनी केली आहे.

## भिवंडीत गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; गांजासकट दोन इसम अटकेत

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२३, भिवंडी (ठाणे) :** गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या दोन इसमांना भिवंडी गुन्हे शाखा घटक-२ च्या पथकाने सापळा रचून अटक केली. त्यांच्या ताब्यातून ४ किलो ८२७ ग्रॅम गांजा व यामाहा फसिनो स्कुटर असा एकूण ३.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींमध्ये प्रशांत उर्फ सलाड सुरेश तायडे (२७, टिटवाळा) व सोहेल उर्फ पित्तल इरफानअली अन्सारी (२०, भिवंडी) यांचा समावेश आहे. त्यांच्यावर एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, प्रशांत तायडे यांच्या घरातून अवैध माऊझर पिस्तूल व जिवंत काडतूस देखील जप्त करण्यात आले असून आरोपींना २४ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव व सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## ओम नवरात्र तरुण मंडळाच्या वतीने मंद्रूपमध्ये रक्तदान

**अक्षराज : शिवराज मूगळे**

**दि.२३, सोलापूर :** दक्षिण सोलापूर मंद्रूप मधील ओम नवरात्र महोत्सव तरुण मंडळ न्यू माळी गल्ली इंदिरानगर येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ६१ रक्तदात्याने उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन शिवानंद अडोळे मंडळाचे अध्यक्ष नितीन आहेरवाडी, मित्र प्रेम प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष शिवराज मुगळे, सिद्धेश्वर ब्लड सेंटर सोलापूरचे नागेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चिदानंद मुगळे,निलाप्प लच्याणे, तमन्ना नंदूरेमंडळाचे उपाध्यक्ष विठ्ठल माळी, मळसिध्द म्हेत्रे, बबलू अडोळे, भैरु लच्याणे, करण नवले, बसवराज लच्याणे, गुरु माळी, दिगंबर मरीवाईले प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराचे आयोजन ओम नवरात्र महोत्सव तरुण मंडळ च्या वतीने करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वी होण्यासाठी राहूल लच्याणे, अप्पांना नवले सह मंडळाचे सदस्य आदींनी परिश्रम घेतले.



## अपघात कमी होऊन वाहतुकीस मोठा दिलासा - शिवेंद्रसिंहराजे भोसले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (माजी राज्य महामार्ग ५५) कि.मी. ०/०० ते कि.मी. ५४/०० या मार्गाच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी एकूण ₹५९.७५ कोटी निधीस मान्यता देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली आहे. तसेच या निर्णयामुळे तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल,अपघातांचा धोका टळेल तसेच औद्योगिक वाहतुकीला मोठा दिलासा मिळेल,असे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री भोसले यांनी सांगितले. तळेगांव-चाकण-शिक्रापूर या मार्गात तळेगांव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चार पदरी रस्ता व चाकण ते शिक्रापूर दरम्यान सहा पदरी रस्ता या कामाचा समावेश आहे. हे संपूर्ण काम बांधा,वापरा आणि हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) तत्वावर बांधण्यात येणार आहे. या मार्गाचा समावेश पूर्वी राज्य रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ अंतर्गत करण्यात आला होता. त्यानंतर भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी असा दर्जा दिला असून,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तो महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.